**चेंबूर जि. मुंबई उपनगर येथे अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलामुलींसाठी शासकीय उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यासाठी अभ्यासक्रमास व त्यासाठी आवश्यक खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : आयटीआय- २०२२/प्र.क्र.३४/व्यशि-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: - २१ नोव्हेंबर, २०२३

**वाचा** : १) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. ईबीसी-२००५/प्र.क. २९५/ मावक-२ दिनांक:- ९.०१.२००६

२) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे क्र.०७/सीटीएस/SCP/ चेंबूर/२०२२/४४३ व ४९२ दिनांक :- ०१.११.२०२२ व २५.११.२०२२ व दि.१३.०६.२०२३ चे पत्र

**प्रस्तावना :**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या दिनांक ०९ जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या मुलांमुलींकरिता सहा विभागीय स्तरावर उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. यामधील नागपूर, अमरावती, नाशिक व औरंगाबाद या विभागाच्या चार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे बांधकाम पुर्ण होऊन त्यांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे व त्यांच्याकरिता आवश्यक ती पदनिर्मीती करण्यात आलेली आहे.

चेंबूर जि. मुंबई उपनगर येथे अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलांमुलींकरीता उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या सहकार्याने सुरु करण्यात येणार आहे. अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलामुलींसाठी मुंबई विभागात शासकीय उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था या कमी प्रमाणात आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांना उद्योन्मुख व रोजगारक्षम करण्याच्यादृष्टीने औद्योगिक संस्था सहाय्यभूत ठरणार आहे. औद्योगिकरणास आवश्यक कुशल मुनष्यबळ पुरविण्यासाठी चेंबूर जि. मुंबई उपनगर येथे अनुसूचित जातीकरीता औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करणे शासनाच्या विचाराधिन होते.

**शासन निर्णय :**

अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलांमुलींकरीता उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था चेंबूर जि. मुंबई उपनगर येथे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या सहाय्याने सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीता इमारत, कर्मचारी यांचे वेतन, संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांकरीता विदयावेतन, प्रशासकीय कामाकरीता कार्यालयीन खर्च तसेच यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीसाठी लागणारा आवर्ती व अनावर्ती खर्च हा सामाजिक न्याय व

विशेष सहाय्य विभागाकडून उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येणार आहे. सदर संस्थेचे कार्यान्वयन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत करण्यात येणार आहे.

२. सदर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत १० व्यवसाय अभ्यासक्रमांच्या प्रत्येकी ०२ तुकडया याप्रमाणे व्यवसाय अभ्यासक्रमांच्या एकूण २० तुकडया सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रस्तावित व्यवसाय अभ्यासक्रमांचा तपशिल प्रपत्र- "अ" मध्ये देण्यात येत आहे. तसेच संस्थेकरीता येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चाचा तपशिल प्रपत्र "ब" मध्ये देण्यात आलेला आहे.

३. सन २०२३-२४ व येणाऱ्या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चेंबूर जि. मुंबई उपनगर या संस्थेमधील यंत्रसामुग्री, साधनसामुग्री, हत्यारे व पदांकरीताचे वेतन याकरीता लागणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्च असा एकुण रू.५३८.८८ लाख (अक्षरी पाच कोटी अडतीस लाख अठ्ठाऐंशी हजार) इतक्या रकमेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

४. चेंबूर जि. मुंबई उपनगर येथे अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलांमुलींकरीता उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीता पदांच्या वेतन व भत्यावरील खर्च, बाह्ययंत्रणेव्दारे उपलब्ध करुन घ्यावयाच्या मनुष्यबळाचा खर्च व विदयावेतन, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री याबाबीकरीता आवर्ती व अनावर्ती खर्च हा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या मागणी क्रमांक एन-४, ४२२५ अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील,भांडवली खर्च पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना (०१)(०१) अनुसूचित जातींच्या मुलांमुलींसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था बांधणे (अ.जा.उ.यो.) (कार्यक्रम) ५३, मोठी बांधकामे (४२२५०४७२) या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध अनुदातून भागविण्यात यावा.

५. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चेंबूर जि. मुंबई उपनगर या संस्थेकीरीता लागणाऱ्या पदांच्या मंजूरीबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

६. सदर शासन निर्णय मा. राज्य मंत्रिमंडळाची दि. ३१ ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसूरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२३११२११५५९१३५३०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MITHUN MOHANRAO SALUNKHE

Digitally signed by MITHUN MOHANRAO SALUNKHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTERPREUNERSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=eb410b645758d07ea6303743e3a96f12f7b5ea5c78305aa3546f1b05a4d188d9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=928224E8C07F06F0A63241EEC16360F9961117B3DFDA771ED6746D1433B5EA7A, cn=MITHUN MOHANRAO SALUNKHE
Date: 2023.11.21 16:00:22 +05'30'

**( मिथुन साळुंखे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत ,**

१. मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव , कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
३. सहसचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
४. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. सहसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

७.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

८. सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत)

९. संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, ( व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत )

१०. निवड नस्ती. (व्यशि-३).

**प्रपत्र - अ**

**अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या मुलामुलींसाठी शासकीय उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था चेंबूर जि. मुंबई उपनगर येथे सुरु करण्याकरिता प्रस्तावित व्यवसाय अभ्यासक्रमांचा तपशिल**

| अ.क्र. | व्यवसाय | तुकडयांची संख्या | प्रवेश क्षमता | यंत्रसामुग्री व हत्यारे एकूण खर्च (रु. लाखांत) | टूलकिट्स |
|---|---|---|---|---|---|
| १ | विजतंत्री (Electrician) | २ | ४० | २०.०० | ५.०० |
| २ | तारतंत्री (Wireman) | २ | ४० | २०.०० | ५.०० |
| ३ | मेकॅनिक ऑटो इलेक्ट्रीकल ॲण्ड इलेक्ट्रोनिक्स (Mechanic Auto Electrical and Electronics) | २ | ४० | २५.०० | ५.०० |
| ४ | इंटीरीअर डिझाईन ॲण्ड डेकोरेशन (Interior Design and Decoration) | २ | ४८ | २०.०० | ५.०० |
| ५ | प्रशितन व वातानुकुलित टेक्निशियन (Refrigeration and Air Conditioner Technician) | २ | ४८ | २५.०० | ५.०० |
| ६ | मेकॅनिक कन्झुमर इलेक्ट्रॉनिक्स (Mechanic Consumer Electronic Appliances) | २ | ४८ | १५.०० | ५.०० |
| ७ | ड्राफ्समन सिव्हील (Draughtsman Civil) | २ | ४८ | २०.०० | ५.०० |
| ८ | लेदर गुडस मेकर (Leather Goods Maker) | २ | ४० | २०.०० | ५.०० |
| ९ | फुटवेअर मेकर (Footwear Maker) | २ | ४० | १५.०० | ५.०० |
| १० | आय.ओ.टी. टेक्निशियन (स्मार्ट सिटी) (IOT Technician (Smart City)) | २ | ४८ | २०.०० | ५.०० |
| | **एकूण** | **२०** | **४४०** | **२००.००** | **५०.००** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **प्रपत्र - ब** | | | | | |
| **अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या मुलामुलींच्या नवीन शासकीय उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था चेंबूर जि. मुंबई उपनगर करीता आवश्यक आवर्ती व अनावर्ती खर्चाचा तपशिल** | | | | | |
| | | | | | **(रु. लाखात)** |
| | **आवर्ती बाब** | | **अनावर्ती बाब** | | |
| **अ.क्र.** | **बाब** | **आवश्यक तरतूद** | **अ.क्र.** | **बाब** | **आवश्यक तरतूद** |
| १ | वेतन | २६७.२५ | १ | यंत्रसामुग्री व हत्यारे | २००.०० |
| २ | विद्यावेतन | १.५८ | २ | टूलकिट्स | ५०.०० |
| ३ | कच्चा माल | १८.०५ | | | |
| ४ | कार्यालयीन खर्च व प्रवास खर्च, इतर खर्च | २.०० | | | |
| | **एकूण** | **२८८.८८** | | **एकूण** | **२५०.००** |
| | **एकूण आवर्ती व अनावर्ती खर्च रु.** | | | | **५३८.८८** |